PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Mala Ek Chanas Hava
Year: 2012

Song: Aika Dadachi Nyari Kimaya
Lyricist: Dr. Shrikant Narule

ध्येयाला जणू स्वप्नचं पडले
सत्य शिव अन् सुंदर हे
कलावंत तुम्ही घडत राहिला
उभविले कलेचे मंदीर हे
हे...

मुजरा करतीया सारी दुनिया
मुजरा करतीया सारी दुनिया
ऐका दादाची न्यारी अशी किमया
ऐका दादाची न्यारी अशी किमया
ऐका दादाची न्यारी अशी किमया
अर्धी चड्डी अंगात बंडी
चड्डीवर लोंबते नाडी
भरदार छाती अंग पोलादी
मराठमोळा गडी
हजार खोड्या करी
तरी आईची सुटंना माया
हजार खोड्या करी
तरी आईची सुटंना माया
ऐका दादाची न्यारी अशी किमया
ऐका दादाची न्यारी अशी किमया
ऐका दादाची न्यारी अशी किमया

माळयाच्या मळयामदी कोण गं उभी
लिहली अस्सल गाणी
काय गं सखू बोला दाजीबा
अशी ही सोपी वाणी
लोकगीत लावणी अभंग
रसिक लागले गाया
लोकगीत लावणी अभंग
रसिक लागले गाया
ऐका दादाची न्यारी अशी किमया
ऐका दादाची न्यारी अशी किमया
ऐका दादाची न्यारी अशी किमया

कथा पटकथा संवादातून
अमर तुम्ही हो झाला
द्वि अर्थाची तुमची मिश्कीली
हसवीत राही जगाला
विनोदातला बादशाह तू
मुजरा तुमच्या पाया
विनोदातला बादशाह तू
मुजरा तुमच्या पाया
ऐका दादाची न्यारी अशी किमया
ऐका दादाची न्यारी अशी किमया
ऐका दादाची न्यारी अशी किमया

विच्छा तुमची पुरी जाहली
गुरू भालजी बाबा
नऊ नऊ पिच्चर सिल्वर ज्युबली
गर्दी तौबा तौबा
रसिकासाठी तुमचे जगणे
रसिक धरती छाया
रसिकासाठी तुमचे जगणे
रसिक धरती छाया
ऐका दादाची न्यारी अशी किमया

Literacy for a Billion

ऐका दादाची न्यारी अशी किमया
ऐका दादाची न्यारी अशी किमया

तुमचा अभिनय तुमची गाणी
होती तुम्हा सारखी
तुम्ही गेल्यावर चित्रसृष्टी ही
झाली हो पोरकी
असला दादा होणे नाही
असला दादा होणे नाही
जगी कुठे ही पहाया

ऐका दादाची न्यारी अशी किमया
ऐका दादाची न्यारी अशी किमया
ऐका दादाची न्यारी अशी किमया

दादाची लई नक्कल करती
नाद नव्हं हयो साधा
जना मनामध्ये अमर जाहले
आमचे विजयी दादा
आमचे विजयी दादा
आमचे विजयी दादा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*